RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष ४, अंक १९] शुक्रवार, एप्रिल ६, २०१८/चैत्र १६, शके १९४० [पृष्ठे ५, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ३६

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७.— महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात सुधारणा करण्याकरिता अधिनियम. पृष्ठे १-५

दिनांक ५ एप्रिल २०१८ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

राजेन्द्र ग. भागवत,
प्रभारी सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ६ एप्रिल २०१८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

२०१७ चा महा. अध्या. २८.

ज्याअर्थी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१७ हा दिनांक २८ नोव्हेंबर २०१७ रोजी प्रख्यापित केला होता ;

आणि ज्याअर्थी, दिनांक ११ डिसेंबर २०१७ रोजी राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्यावर, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०१७ (सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६८) हे, महाराष्ट्र विधानसभेने दिनांक २१ डिसेंबर २०१७ रोजी संमत केले होते आणि महाराष्ट्र विधानपरिषदेकडे ते पारेषित करण्यात आले होते ;

(१)

भाग चार ३६—१

आणि ज्याअर्थी, त्यानंतर दिनांक २२ डिसेंबर २०१७ रोजी महाराष्ट्र विधानपरिषदेची सत्र समाप्ती झाल्यामुळे महाराष्ट्र विधानपरिषदेत उक्त विधेयक संमत होऊ शकले नाही ;

आणि ज्याअर्थी, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३(२)(क) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, उक्त अध्यादेश, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन पुन्हा सुरू झाल्याच्या दिनांकापासून सहा आठवड्यानंतर म्हणजेच २१ जानेवारी २०१८ या दिनांकानंतर, अंमलात असण्याचे बंद झाले असते ;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, उक्त अध्यादेशाच्या तरतुदी अंमलात असण्याचे चालू ठेवण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २० जानेवारी २०१८ रोजी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१८ (यात यापुढे ज्याचा निर्देश "पुढे चालू ठेवणे अध्यादेश" असा करण्यात आला आहे) हा प्रख्यापित केला होता ; २०१८ चा महा. अध्या. १.

आणि ज्याअर्थी, उक्त पुढे चालू ठेवणे अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अडुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०१७ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २८ नोव्हेंबर २०१७ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ३० ची सुधारणा.

२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३० मध्ये, पोट-कलम (४) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— २०१७ चा महा. ६.

" परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतनंतर व्यवस्थापन परिषदेच्या प्रारंभीच्या मुदतीसाठी, खंड (च), (छ), (ज) व (झ) खालील प्रवर्गांमधील उमेदवाराच्या निवडणुकीकरिता उक्त खंडांन्वये राखीव प्रवर्गांचे आळीपाळीने देण्यात येणारे आरक्षण हे, कुलगुरूकडून चिठ्ठ्या टाकून काढलेल्या सोडतीद्वारे ठरविण्यात येईल, आणि अशा चिठ्ठ्यांची सोडत काढताना, प्रत्येक राखीव प्रवर्गातील व्यक्तीला व्यवस्थापन परिषदेवर प्रतिनिधित्व मिळेल, याची सुनिश्चिती करण्यात येईल. ".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम ६२ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ६२ मध्ये, पोट-कलम (२) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतनंतर विद्यापीठ प्राधिकरणांच्या प्रारंभिक मुदतीसाठी निवडणूक, नामनिर्देशन व स्वीकृतीची प्रक्रिया ३१ मे २०१८ च्या नंतर नाही अशा मुदतीत पूर्ण करण्यात येईल. ".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ यामध्ये नवीन कलम ९९क समाविष्ट करणे.

४. मुख्य अधिनियमाच्या कलम ९९ नंतर, पुढील कलम जादा दाखल करण्यात येईल :—

विद्यार्थी परिषद घटित करण्यासाठी तात्पुरती तरतूद.

" **९९क.** कलम ९९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी, विद्यार्थी परिषद घटित करण्याच्या संबंधात, पुढील तरतूद लागू होईल :—

(१) विद्यार्थ्यांच्या कल्याणाकरिता आणि अधिक चांगल्या प्रकारच्या सामुदायिक जीवनासाठी वेगवेगळ्या विद्यार्थी संघटनांच्या पाठ्येतर कार्यक्रमांचे प्रचालन करण्याकरिता व त्याबाबतीत समन्वय साधण्याकरिता,

पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे, एक विद्यापीठ विद्यार्थी परिषद असेल, विद्यापीठाच्या विभागांसाठी एक विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषद असेल आणि विद्यापीठाच्या प्रत्येक संचालित महाविद्यालयासाठी किंवा परिसंस्थेसाठी किंवा प्रत्येक संलग्न महाविद्यालयासाठी, एक विद्यार्थी परिषद असेल. या परिषदा राजकीय चळवळींमध्ये भाग घेणार नाहीत.

(२) (क) विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेत पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) कुलगुरू अध्यक्ष ;

(दोन) विद्यार्थी विकास संचालक सभापती ;

(तीन) संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण ;

(चार) संचालक, राष्ट्रीय सेवा योजना ;

(पाच) मागील पदवी परीक्षेत ज्याने विद्याविषयक गुणवत्ता दर्शविली आहे आणि जो एखाद्या विद्यापीठात, परिसंस्थेत किंवा विभागात किंवा संचालित महाविद्यालयात पूर्ण वेळ अभ्यासक्रम पार पाडीत आहे असा, कुलगुरूने नामनिर्देशित केलेला प्रत्येक विद्यापीठ विभागातील एक विद्यार्थी ;

(सहा) प्र कुलगुरूने नामनिर्देशित केलेल्या दोन विद्यार्थिनी आणि जर प्र कुलगुरू नसेल तर, कुलगुरू दोन विद्यार्थिनींना नामनिर्देशित करील.

(ख) प्रत्येक परिसंस्थेच्या, संचालित महाविद्यालयाच्या किंवा संलग्न महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेत पुढील सदस्यांचा समावेश असेल :—

(एक) प्राचार्य—सभापती ;

(दोन) प्राचार्यांने नामनिर्देशित केलेला एक अधिव्याख्याता ;

(तीन) राष्ट्रीय छात्र सेनेचा प्रभारी अध्यापक ;

(चार) राष्ट्रीय सेवा योजनेचा कार्यक्रम अधिकारी ;

(पाच) मागील वर्षी घेण्यात आलेल्या परीक्षेत ज्याने विद्याविषयक गुणवत्ता दर्शविली आहे आणि महाविद्यालयात जो पूर्ण वेळ अभ्यासक्रम पार पाडीत आहे असा, प्राचार्यांने नामनिर्देशित केलेला प्रत्येक वर्गातील एक विद्यार्थी ;

(सहा) संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण, कोणताही असल्यास ;

(सात) ज्याने लक्षणीय यश मिळविले आहे असा, प्राचार्यांने नामनिर्देशित केलेला पुढील क्षेत्रातील प्रत्येकी एक विद्यार्थी :—

(१) क्रीडा ;

(२) राष्ट्रीय सेवा योजना आणि प्रौढ शिक्षण ;

(३) राष्ट्रीय छात्र सेना ;

(४) सांस्कृतिक कार्ये ;

(आठ) प्राचार्यांने नामनिर्देशित केलेल्या दोन विद्यार्थिनी :

परंतु, प्रवर्ग (सात) व (आठ) मधील दोन विद्यार्थी, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती किंवा इतर मागासवर्ग यांमधील असतील.

(३) या दोन्ही परिषदांचे विद्यार्थी सदस्य आपल्यामधूनच संबंधित परिषदेचा सचिव निवडतील.

(४) (क) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या परिनियमांद्वारे विहित करण्यात आल्याप्रमाणे पोट-कलम (३) खालील संबंधित परिषदांच्या सचिवांमधून निवड करून त्याद्वारे नामनिर्देशित करण्यात आलेल्या पंधराहून अधिक नसतील अशा व्यक्तींचा समावेश असलेली एक विद्यापीठ विद्यार्थी परिषद असेल :

परंतु, यापैकी प्रत्येकी किमान एक जागा पुढील वर्गातील विद्यार्थ्यांसाठी राखून ठेवण्यात येईल :

(एक) अनुसूचित जाती ;

(दोन) अनुसूचित जमाती ;

(तीन) विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती ;

(चार) इतर मागासवर्ग ; आणि

(पाच) एक जागा विद्यार्थीनींसाठी,

उरलेल्या जागांचे जिल्हानिहाय वाटप करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, निवड करून त्याद्वारे नामनिर्देशित करण्याकरिता, शैक्षणिक कामगिरी, राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना व प्रौढ शिक्षण, सांस्कृतिक कार्य किंवा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी अंमलात असलेल्या परिनियमांद्वारे विहित करण्यात येतील अशी इतर कार्ये यांमधील सहभाग यासंबंधातील तपशील विचारात घेण्यात येईल.

(ख) अशाप्रकारे रचना करण्यात आलेली विद्यापीठ विद्यार्थी परिषद, स्वत:च आपला सभापती व सचिव निवडील.

(ग) विद्यापीठ विद्यार्थी परिषदेच्या प्रत्येक बैठकीमध्ये कुलगुरू हा, अध्यक्षस्थानी असेल व विहित करण्यात येतील असे इतर अधिकारी या बैठकीला उपस्थित असतील.

(५) कोणताही विद्यार्थी त्याची पूर्ण वेळ विद्यार्थी म्हणून नावनोंदणी झाली असेल तरच कोणत्याही विद्यार्थी परिषदेचा सदस्य असण्यास किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास पात्र असेल.

(६) २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता विद्यार्थी परिषदेच्या विद्यार्थी सदस्यांचे नामनिर्देशन, व्यवस्थापन परिषदेने निश्चित केल्या जाणाऱ्या दिनांकास, करण्यात येईल. नामनिर्देशित विद्यार्थी सदस्यांचा पदावधी हा नामनिर्देशनाच्या दिनांकापासून सुरू होईल आणि तो पदावधी, दरम्यानच्या कालावधीत अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही निरर्हता त्यांनी आपल्यावर ओढवून घेतलेल्या नसतील तर, शैक्षणिक वर्षाच्या शेवटच्या दिनांकापर्यंत अंमलात असेल, आणि त्यानंतर तो समाप्त होईल.

(७) परिषदेच्या एक-तृतीयांश सदस्य मिळून बैठकीची गणपूर्ती होईल. बैठकीचे कामकाज चालविण्यासंबंधीचे नियम व कार्यपद्धती आणि अशा इतर बाबी विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील. परिषदेची दर तीन महिन्यांमध्ये किमान एक बैठक होईल. ".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

५. मुख्य अधिनियमाच्या कलम १०९ च्या, पोट-कलम (३) मध्ये, खंड (घ) मधील, विद्यमान परंतुकानंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :-

" परंतु आणखी असे की, विद्यापीठास नवीन महाविद्यालय सुरू करण्यासाठी परवानगी मागणाऱ्या अर्जांवर निर्णय घेणे सोयीचे व्हावे यासाठी, या अधिनियमाच्या, प्रारंभाच्या लगतनंतरच्या पहिल्या शैक्षणिक वर्षासाठी यासोबतच्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (३) च्या खंड (क), (ग) आणि (घ) यांमध्ये निर्देशिलेले दिनांक हे उक्त तक्त्यामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे वाचण्यात येतील :-

तक्ता

खंड	विद्यमान तरतुदीमधील दिनांक	२०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता दिनांक
(१)	(२)	(३)
(क)	वर्षाच्या सप्टेंबर महिन्याचा शेवटचा दिवस	१५ डिसेंबर २०१७
(ग)	वर्षाच्या ३० नोव्हेंबर रोजी किंवा त्यापूर्वी	१५ जानेवारी २०१८ पूर्वी
(घ)	लगेच पुढच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी	२८ फेब्रुवारी २०१८ पूर्वी ".

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १४६ ची सुधारणा.

६. मुख्य अधिनियमाच्या कलम १४६ मध्ये, पोट-कलम (१) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(१) विद्यमान विद्यापीठाचे प्रत्येक प्राधिकरण हे, व्यवहार्य असेल तेथवर, परंतु ३१ मे २०१८ नंतर नाही, अशा मुदतीच्या आत या अधिनियमाच्या तरतुदीनुसार पुनर्घटित करण्यात येईल. असे प्रत्येक प्राधिकरण हे, कुलगुरू अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापासून पुनर्घटित करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.".

सन २०१८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ याचे निरसन व व्यावृत्ती.

२०१८ चा महा. अध्या. १.

७. (१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा व पुढे चालू ठेवणे) अध्यादेश, २०१८ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदीन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदीन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

RNI No. MAHENG /2009/35528

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग आठ

वर्ष ४, अंक २६] शुक्रवार, एप्रिल ६, २०१८/चैत्र १६, शके १९४० [पृष्ठे ५, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ६०

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Public Universities (Amendment) Act, 2017 (Mah. Act No. XXVII of 2018), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA G. BHAGWAT,
I/c. Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

MAHARASHTRA ACT No. XXVII of 2018

(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 6th April 2018).

An Act to amend the Maharashtra Public Universities Act, 2016.

Mah. Ord. XVIII of 2017.

WHEREAS the Governor of Maharashtra had promulgated the Maharashtra Public Universities (Amendment) Ordinance, 2017 on the 28th November 2017 ;

AND WHEREAS upon the re-assembly of the State Legislature on the 11th December 2017, the Maharashtra Public Universities (Amendment) Bill, 2017 (L. A. Bill No. LXVIII of 2017), for converting the said Ordinance into an Act of the State Legislature, was passed the Maharashtra Legislative Assembly on the 21st December 2017 and was transmitted to the Maharashtra Legislative Council ;

AND WHEREAS thereafter, as the session of the Maharashtra Legislative Council was prorogued on the 22nd December 2017, the said Bill could not be passed by the Maharashtra Legislative Council ;

AND WHEREAS as provided by article 213 (2)(a) of the Constitution of India, the said Ordinance shall cease to operate at the expiration of six weeks form the date of re-assembly of the State Legislature, that is, after the 21st January 2018 ;

AND WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ; and the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action to continue the operation of the provisions of the said Ordinance, for the purposes hereinafter appearing; and, therefore, promulgated the Maharashtra Public Universities (Amendment and Continuance) Ordinance, 2018 (hereinafter referred to as " the said Continuance Ordinance ") on the 20th January 2018 ; Mah. Ord. I of 2018.

AND WHEREAS it is expedient to replace the said Continuance Ordinance by an Act of the State Legislature ; it is hereby enacted in the Sixty-eighth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

1. (*1*) This Act may be called the Maharashtra Public Universities (Amendment) Act, 2017.

(2) It shall be deemed to have come into force on 28th November 2017.

Amendment of section 30 of Mah. VI of 2017.

2. In section 30 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (hereinafter referred to as "the principal Act"), after sub-section (*4*) following proviso shall be added, namely :— Mah. VI of 2017.

"Provided that, for the election of the candidate from the reserved categories, under clauses (*f*), (*g*), (*h*) and (*i*), for the initial term of Management Council, immediately after the commencement of this Act, point of rotation for reserved categories under the said clauses shall be decided by drawing of lots by Vice-Chancellor, and while drawing of lots, it shall be ensured that the person belonging to each reserved category shall have representation on the Management Council.".

Amendment of section 62 of Mah. VI of 2017.

3. In section 62 of the principal Act, after sub-section (2) following proviso, shall be added, namely :—

"Provided that, for the initial term of the authorities of the Universities, immediately after the commencement of this Act, the process of election, nomination and co-option shall be completed not later than 31st May 2018.".

Insertion of section 99A in Mah. VI of 2017.

4. After section 99 of the principal Act, the following section shall be added, namely :—

Temporary provisions for Constitution of Students' Council.

"**99A.** Notwithstanding anything contained in section 99, for the academic year 2017-18, with regard to the constitution of Students' Council the following provisions shall apply :—

(*1*) There shall be a University Students' Council as specified in sub-section (*4*), a University Department Students' Council for

the departments of the University and a Students' Council for each conducted college or institution of the University and each affiliated college, to look after the welfare of the students and to promote and co-ordinate the extracurricular activities of different students' associations for better corporate life. The Councils shall not engage in political activities.

(2) (*a*) The University Department Students' Council shall consist of the following members, namely :—

(*i*) Vice-Chancellor — President ;

(*ii*) Director of Students' Development — Chairman ;

(*iii*) Director of Sports and Physical Education ;

(*iv*) Director of National Service Scheme ;

(*v*) One student from each university department who has shown academic merit at the preceding degree examination and is engaged in full time studies in a university, institution or department or conducted college, nominated by the Vice-Chancellor ;

(*vi*) Two lady students nominated by the Pro-Vice-Chancellor and if there is no Pro-Vice-Chancellor, the Vice-Chancellor shall nominate two lady students.

(*b*) the Students Council for each institution, conducted college or affiliated college shall consist of the following :—

(*i*) Principal- Chairman ;

(*ii*) One lecturer, nominated by the Principal ;

(*iii*) Teacher in charge of National Cadet Corps ;

(*iv*) National Service Scheme Programme Officer ;

(*v*) One student from each class, who has shown academic merit at the examination held in the preceding year and who is engaged in full-time studies in the college, nominated by the Principal ;

(*vi*) Director of Sports and Physical Education, if any ;

(*vii*) One student from each of the following activities, who has shown outstanding performance, nominated by the Principal, namely :—

(1) Sports ;

(2) National Service Scheme and Adult Education;

(3) National Cadet Corps ;

(4) Cultural Activities ;

(*viii*) Two lady students nominated by the principal :

Provided that, two of the students from the categories (*vii*) and (*viii*) shall be those belonging to the Scheduled Castes or Scheduled Tribes or De-notified Tribes (*Vimukta Jatis*) or Nomadic Tribes or Other Backward Classes.

(*3*) The student member's of both these Councils shall elect, from amongst themselves, the Secretary of their respective Council.

(4) (a) There shall be University Students' Council consisting of not more than fifteen persons, nominated through selection, from amongst Secretaries of the respective councils under sub-section (3), as prescribed by the Statutes existing immediately prior to the date of commencement of this Act :

Provided that, at least one seat each be reserved for students belonging to–

(i) Scheduled Castes ;

(ii) Scheduled Tribes ;

(iii) De-notified Tribes (*Vimukta Jatis*) or Nomadic Tribes

(iv) Other Backward Classes ; and

(v) One seat for women students,

remaining seats being distributed district-wise :

Provided further that, for the purpose of nomination through selection details based on academic performance, participation in National Cadet Corps, National Service Scheme and Adult Education, Cultural Activities or such other activities as may be prescribed by the Statutes existing immediately prior to the date of commencement of this Act.

(b) The University Students' Council so formed shall elect its own President and Secretary.

(c) Every meeting of the University Students' Council shall be presided over by the Vice-Chancellor and shall be attended by such other officers as may be prescribed.

(5) A student shall be eligible to be, or continue to be, a member of any of the Students' Council, only if he is enrolled as a full time student.

(6) The nomination of the student members of the Students' Council shall be made for the academic year 2017-2018 on the date to be fixed by the Management Council. The term of office of the nominated student members shall begin with effect from the date of nomination and shall extend upto the last day of the academic year, unless they have, in the meantime, incurred any of the disqualifications specified by or under the Act; and shall then expire.

(7) One third of the members of the Council shall constitute the quorum. The rules and procedure for conduct of business of the meetings and such other matters shall be such as may be prescribed. The Council shall meet at least once in every three months.".

Amendment of section 109 of Mah. VI of 2017.

5. In section 109 of the principal Act, in sub-section (3), after clause (d), after the existing proviso the following proviso shall be inserted, namely :—

"Provided further that, for the first academic year, immediately after the commencement of this Act with a view to facilitate the Universities to decide the applications for permission for opening of

new College the dates referred to in clauses (*a*), (*c*) and (*d*) of sub-section (*3*) as specified in column (2) of the Table hereto shall be read as provided in column (3) of the said Table :—

Table

Clauses	For the date existing provision	Date for the Academic Year 2017-18
(1)	(2)	(3)
(*a*)	Last day of September of the Year.	15th December 2017.
(*c*)	Before 30th of November of the year.	Before 15th January 2018.
(*d*)	Before 31st January of the immediately following year.	Before 28th February 2018. ".

Amendment of section 146 of Mah. VI of 2017.

6. In section 146 of the principal Act, for sub-section (*1*), following shall be substituted, namely :—

"(*1*) Every authority of an existing university shall, as soon as practicable, but not later than 31st May 2018, be reconstituted in accordance with the provisions of this Act. Every such authority shall, be deemed to be reconstituted with effect from such date as the Vice-Chancellor may, from time to time, specify by notification.".

Repeal of Mah. Ord. I of 2018 and saving.

Mah. Ord. I of 2018.

7. (*1*) The Maharashtra Public Universities (Amendment and Continuance) Ordinance, 2018, is hereby repealed.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the corresponding provisions of the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of the principal Act as amended by this Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI